## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

ग्राहक तक्रार क्र. ८३/२०११ दि.१२.०५.२०११

| | |
|---|---|
| श्री.शशिकांत आबाजी पवार.<br>मु.पो.भिंगळोली<br>ता.मंडणगड, जि.रत्नागिरी. | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता 'महावितरण'<br>स व सु विभाग खेड . | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप , कार्यकारी अभियंता<br>३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | श्री.शशिकांत आबाजी पवार.<br>श्री. प्रताप अ. सावंतदेसाई. |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | श्री.सिद्धार्थ तावाडे.(कार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय खेड<br>श्री.प्रकाश विश्राम गोंडाळकर .( सहा.लेखापाल)<br>उपविभाग मंडणगड<br>श्री.कैलास सु.मोरे (उ.लिपिक)<br>विभागीय कार्यालय खेड |

## महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :

---

तक्रारदार ग्राहक श्री.शशिकांत आबाजी पवार, राहणार घर क्र.१५२, मल्हार एस.टी.डेपो समोर, ग्रामपंचायत भिंगळोली, तां.मंडणगड, जि.रत्नागिरी यांनी आपल्या राहत्या घरामध्ये न्याहरी निवास योजनेअंतर्गत पर्यटकांची सोय व्हावी व त्या भागातील पर्यटनाचा विकास व्हाया या उद्देशाने पर्यटकासाठी निवासाची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. पण महावितरण कडून सदर ठिकाणी असलेल्या मिटरवर होणारा वीज वापर वाणिज्य समजून त्या प्रमाणे दर आकारणी करीत आहेत व हे चुकीचे असून ही आकारणी पुर्वीप्रमाणेच निवासी दराने करण्याबाबत महावितरणला आदेश व्हावेत अशा आशयाची तक्रार, या मंचाकडे दि.१२.०५.२०११ रोजी विहीत नमुन्यामध्ये व योग्य त्या कागदपत्रासह सादर केलेली आहे.

तक्रार प्राप्त होताच खेड विभागीय कार्यालयाकडून पत्र क्रं.९२९, दि.१६.०५.२०११ अन्वये स्पष्टीकरण मागविण्यात आले व त्यानंतर दि.१५.०६.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधी श्री. प्रताप अ.सावंतदेसाई यानी तक्रारदार ग्राहक श्री.शशिकांत पवार यांच्या गाडीला अपघात झालेला असून श्री.पवार हे हॉस्पीटलमध्ये ॲडमीट आहेत, त्यामुळे या सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याबाबत विनंती केली. सदर विनंती ग्राहय मानून परत दुसरी सुनावणी दि.२६.०७.२०११ रोजी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदार ग्राहक श्री.शशिकांत आबाजी पवार यांनी स्वतः युक्तीवाद केला तसेच महावितरणच्या वतीने श्री.तावाडे, कार्यकारी अभियंता, खेड विभागीय कार्यालय यांनी युक्तीवाद केला.

श्री.पवार यांनी सुनावणी दरम्यान आपला युक्तीवादात स्पष्ट करताना सांगितले की, त्यांचे स्वतःचे मौजे.मंडणगड येथे राहते घर असून कोकणामध्ये पर्यटनाचा विकास व्हावा, येणा-या पर्यटकांची राहण्याची सोय व्हावी तसेच स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने त्यांनी त्यांच्या घरामध्ये 'न्याहरी निवास योजने' अंतर्गत निवासाची सोय केली आहे. संबंधीत बाबीसाठी पर्यटन विकास महामंडळाकडूनही मान्यता घेणेत आलेली आहे. असे असताना महावितरणने त्यांच्याकडे असलेल्या पाच मिटर पैकी तीन मिटर काढून टाकले. पैकी एक मिटर राहत्या घरासाठी असे ठरवून दुस-या मिटरचा वापर पर्यटकासाठी निवासाची सोय करण्यासाठी असून, महावितरणने त्यांच्या टेरीफ ऑर्डरप्रमाणे या मिटरवरील वीज वापर वाणिज्य दराने करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. सद्या त्या मिटर वरील वीज वापर वाणिज्य दराने होत असून हा निर्णय अत्यंत चुकीचा व अन्यायकारक आहे. या संदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचा शासन निर्णय त्यांनी महावितरणला सादर केला असून सदर निर्णयामध्ये मुबंई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२४(१) अन्वये हॉटेल व उपहारगृहे यांना लागू असलेले नियम, अटी व कर हे न्याहरी निवास योजने करीता लागू नाहीत असे स्पष्टपणे म्हटले आहे. तसेच व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी त्यांचे दि.०६.१०.२००९ च्या पत्रामध्ये देखिल अशाच प्रकारचा प्रस्ताव मंत्री मंडळ स्तरावर मंजूर करुन घेण्याबाबत सुचना केल्या आहेत. पण हया कोणत्याही बाबींचा विचार न करता महावितरणने एकतर्फी निर्णय घेऊन सदर विज आकारणी व्यापारी दराने करणे चुकीचे आहे. येणा-या पर्यटकांकडून फक्त रु.५००/- प्रति रुम या दराने ते भाडे घेत असतात. अशा परिस्थितीत महावितरणने जर आपला निर्णय बदलला नाही तर इतक्या अल्प कमाई मध्ये महावितरणचे वीज बिल भरणे शक्य होणार नाही. महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी, जसे अलिबाग, महाबळेश्वर, येथे अशा प्रकारे न्याहरी निवासाची सोय करणा-यांना घरगुती दराने वीजेची आकारणी होत असताना

फक्त त्यांनी व्यापारी दराने वीज बिल भरणे अन्यायकारक होणार आहे. त्यामुळे या मिटरची बिले व्यापारी दराने न देता निवासी दराने द्यावीत तसेच या पुर्वी भरलेल्या सर्व वीज बिलामधील फरकाची रक्कम परत मिळावी.

महावितरणकडून श्री.तावाडे, कार्यकारी अभियंता, खेड विभागीय कार्यालय यांनी आपला युक्तीवाद करताना स्पष्ट केले की, श्री.पवार यांचे ते रहात असलेले घर हे स्वतंत्र असून R.C.C बंगला आहे. त्या बंगल्याचे मिटर स्वतंत्र असून सदर बंगल्याचा वापर ते फक्त स्वत: चे वापरासाठी करीत असतात. या बंगल्याच्या बाजूला भाडेकरुसाठी बांधलेली चाळ असून ती चाळ या बंगल्यापासून स्वतंत्र आहे. या चाळीमध्ये प्रत्येक भाडेकरुसाठी एक या तत्वाप्रमाणे चार मिटर होते. कालांतराने हे भाडेकरु गेल्यानंतर याच रुमचा वापर पर्यटकांना न्याहरी निवासाची सोय करण्याकरीता होत आहे. महावितरणचे परिपत्रक क्र.८८, दि.२९.०४.२०१० अन्वये एकाच इमारती मध्ये एकाच उद्देशासाठी अनेक मिटर देता येत नाहीत, त्यामुळे या चाळीसाठी असलेल्या चार मिटरपैकी तीन मिटर काढून टाकुन एकच मिटर ठेवणेत आला आहे. MERC टेरीफ ऑर्डर क्रं.१११/२००९ अन्वये व्यापारी तत्वावर वीज आकारणी करण्याबाबतच्या उद्योगाची यादी व व्याख्या दिलेली असून त्यानुसार न्याहरी निवास योजने करीता व्यापारी दाराने वीज आकारणी करणे योग्य आहे. श्री.पवार यांनी सांगीतल्याप्रमाणे न्याहरी निवासाची सोय ते त्यांच्या राहत्या घरी करीत नसून त्यासाठी वापरात असलेली इमारत स्वतंत्र आहे. ग्रामपंचायतीने दिलेल्या दाखल्यानुसार त्यांच्या घराचा नं.' १५०- अ' असा आहे व जिथे पर्यटकांची सोय केलेली आहे. त्या इमारतीचा घर नंबर १५० असा आहे. मा.मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय बांद्रा यांचे पत्र क्र.पीआर - ३/टॅरिफ/८८/१२३१९, दि.२२.०४.२०१० अन्वये पर्यटकांसाठी स्वतंत्र इमारत बांधली तर त्या इमारतीतील विद्युत ग्राहकांना बिगर घरगुती (वाणिज्य) दराने विद्युत देयकाची आकारणी करावी असे स्पष्ट आदेश दिले आहेत.

श्री.पवार यांनी आतापर्यंत सादर केलेल्या कागदपत्रामध्ये वेगवेगळया स्तरावरील अधिका-यांनी अशा प्रकारच्या निवासाकरीता व्यापारी दराने वीज आकारणी न करण्याबाबत शिफारस केलेली असून, शासनाच्या कोणत्याही स्तरावर अशा प्रस्तावांना अद्याप पर्यन्त मंजूरी मिळालेली नाही. न्याहरी निवासाची सोय करण्यात आलेली इमारत ही स्वतंत्र तर आहेच, पण यामधील प्रत्येक रुम सुखसोईनी सुसज्ज आहे. प्रत्येक रुममध्ये T.V. व अनुशंगीक बाबींच्या सोई आहेत व त्यामुळे मंडणगड सारख्या ठिकाणी या रुमचा दर प्रत्येकी रु.५००/- लावलेला आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता महावितरणकडून घेतलेला निर्णय योग्य असून श्री.पवार यांच्यामार्फत चालविणेत येणा-या न्याहरी निवासाच्या सोईच्या ठिकाणी व्यापारी दराने वीज आकारणी करणेच योग्य आहे.

ग्राहकाकडून सादर झालेली कागदपत्रे , उभयबाजुनी केलेला युक्तीवाद, महावितरणकडून सादर करणेत आलेली कागदपत्रे, प्रत्यक्ष घटनास्थळाचे फोटोग्राफ या सर्वाचा सखोल अभ्यास करता असे लक्षात येते की, श्री.शशिकांत आबाजी पवार तक्रारदार ग्राहक हे राहत असलेली किंवा त्यांच्या स्वत:च्या वापरासाठी असलेली इमारत ही स्वतंत्र असून न्याहरी निवासाची सोय करणेत आलेली इमारत स्वतंत्र आहे. ग्रामपंचायतीकडून सादर करण्यात आलेल्या दाखल्यावरुन तक्रारदार राहत असलेल्या इमारतीचा घर 'नं.१५०-अ' असा असून न्याहरी निवासाच्या इमारतीचा नंबर १५० आहे असे स्पष्टपणे दिसून येते.

तक्रारदार अर्जदारानी सादर केलेल्या कागदपत्राची पहाणी केली असता असे लक्षात येते की, पर्यटकांच्या सोईसाठी जिथे न्याहरी निवासाची सोय करण्यात आली आहे अशा इमारतीसाठी करण्यात येणा-या वीज पुरवठयाची आकारणी व्यापारी तत्वावर न करता निवासी दराने करावी अशी शिफारस वेगवेगळया शासन स्तरावरुन केलेली आहे. पण अशा प्रकारच्या कोणत्याही शिफारशीस मंजुरी दिली असल्याचे प्राप्त कागदपत्रावरुन लक्षात येत नाही.

MERC Tariff Order १११ / २००९ अन्वये व्यापारी दराने आकारणी करण्यासाठी पात्र उद्योगाची यादी दिलेली असून त्यानुसार न्याहरी निवासाची सोय करणेत आलेल्या ठिकाणी व्यापारी दराने वीज आकारणी करणे योग्य होईल असे मंचास वाटते.

मुख्य अभियंता (वाणिज्य) प्रकाशगड, बांद्रा यांच्या पत्रानुसार पर्यटकांच्या सेवेसाठी स्वतंत्र इमारत बांधलेली असेल तर अशा इमारतींना व्यापारी दराने आकारणी करण्याबाबत सुचाना दिलेल्या आहेत व प्रस्तूत प्रकरणात पर्यटकांसाठी असलेली इमारत ही स्वतंत्र असून तिचा घर नंबर देखिल स्वतंत्र आहे. त्यामुळे MERC Tariff Order १११ / २००९ मधी विवेचन व मुख्य अभियंता (वाणिज्य) यांनी दिलेला आदेश लक्षात घेता श्री.शशिकांत आबाजी पवार, तक्रारदार ग्राहक यांचे न्याहरी निवास योजनेसाठी वापरात असलेल्या इमारतीस वाणिज्य दरानेच विज आकारणी करणे योग्य आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे व यामध्ये महावितरणने घेतलेला निर्णय हा रास्त आहे असे स्पष्टपणे सिद्ध होते.

महावितरणकडून सादर करण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये एकाच इमारतीत एकाच प्रयोजनासाठी एकाच नावावर अनेक कनेक्शन असू नयेत असा आदेश असून त्यानुसार महावितरणने संबंधीत प्रकरणातील न्याहरी निवासाच्या ठिकाणचे तीन मिटर काढून एकच मिटर ठेवलेला आहे. यामध्ये महावितरणकडून घेतलेला निर्णय चुकीचा आहे असे मंचास वाटत नाही.

सुनावणीच्या दरम्यान तक्रारदारानी नमुद केल्याप्रमाणे, महाराष्ट्रातील अलिबाग, महाबळेश्वर येथिल न्याहरी निवास असलेल्या ग्राहकांना निवासी दर लावत असल्याचे नमुद केले. सुनावणीच्या दरम्यानच मंचाकडून त्यांना या बाबीसाठी लेखी पुरावा सादर करण्यास सांगितले होते. अर्जदार यांनी दि.१६.०८.२०११ रोजी दोन दस्तऐवज सादर केले. परंतू त्या दस्तऐवजांचा वीज पुरवठा या क्षेत्राशी काही संबंध नाही. याशिवाय अर्जदारांनी वेगळयाच इमारतीत व्यवसाय सुरु केला असल्यामुळे हे दस्तऐवज विचारात घेणे मंचास आवश्यक वाटत नाही.

तक्रार प्रकरणात जे निष्कर्ष व अनुमान काढले आहेत, त्यनुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

**१. ग्राहकाची तक्रार अमान्य करण्यात आली असून तक्रार प्रकरणातील हरकती , आक्षेप व अनुषंगिक बाबी फेटाळण्यात आलेल्या आहेत.**

**२. महावितरणेने वर्गिकरणाच्या अनुषंगाने असणारी आपली थकबाकी नियमाच्या अधिन राहून वसुल करावी.**

**३. खर्च किंवा अनुषंगिक बाबीबद्दल कोणताही आदेश नाही.**

४. या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :-

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग
६०६/६०८, केशवा बिल्डींग,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.
फोन नं. ०२२ / २६५९२९६५

| | | |
|---|---|---|
| डी. एस्. जामखेडकर | व्हि.बी.जगताप | एन्.ए.कुलकर्णी |
| अध्यक्ष | कार्यकारी अभियंता व सचिव | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- २३.०८.२०११
ठिकाण :- रत्नागिरी.